# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर-वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेस नोट क्र. १३६** **दिनांक २७/०५/२०२१**

## अल्पवयीन मुलीस चाकुचा धाक दाखवून अतीप्रसंग करणा-यास नवघर पोलीसांकडून अटक

दि. २४.०५.२०२१ रोजी नवघर पोलीस ठाणे येथे गुरनं. I ३८७/२०२१ भा.दं.वि.सं.कलम ३७६(२) (आय) (एन), ३२३,५०४,५०६ सह बालकांचे लैंगीक अपराधापासुन संरक्षण अधिनियम २०१२ चे कलम ४, ८, १२ प्रमाणे आरोपी नामे मन्या याचेविरुध्द गुन्हा नोंद करण्यात आलेला होता. नमुद गुन्हयातील अल्पवयीन पिडीत मुलीचे आईने दिलेल्या फिर्यादवरुन सदरचा गुन्हा नोंद करण्यात आलेला होता. नमुद गुन्हयातील आरोपीने पिडीत मुलगी ही अल्पवयीन आहे हे माहित असताना देखील त्याने तिला चाकुचा धाक दाखवुन तिचेशी जबरदस्तीने शरिरसबंध केले होते.

सदरचा गुन्हा हा गंभीर स्वरुपाचा असल्याने गुन्हयाचे गांभीर्य लक्षात घेवुन गुन्हयातील आरोपीस लवकरात लवकर अटक करणेकरीता गुन्हयाचे तपास अधिकारी व नवघर पोलीस ठाण्याचे गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी, अंमलदार यांनी गुन्हयाचे ठिकाणी येणा-या जाणा-या रस्त्यावरील तसेच इतरत्र असलेल्या सी.सी.टि.व्ही. कॅमे-यांची पडताळणी व तांत्रिक तपास करुन तसेच गुप्त बातमीदाराचे मार्फतीने माहिती मिळाली की, यातील आरोपी हा कुर्ला रेल्वे स्टेशन, मुंबई येथुन रेल्वेने प्रयागराज, उत्तरप्रदेश येथे पळुन जाणार आहे त्यावरुन नवघर पोलीस पथकाने कुर्ला रेल्वे स्टेशन परिसरात सापळा रचुन आरोपी रविकुमार ऊर्फ मन्या कमलेश पटेल, वय २६ वर्षे, सध्या रा. गणेश देवळ नगर, भाईंदर पश्चिम, जि. ठाणे मुळ रा. चित्रकुट, उत्तरप्रदेश यास ताब्यात घेतले.

सदरची कामगिरी श्री. अमीत काळे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-०१, डॉ. शशीकांत भोसले, सहा.पो.आयुक्त, नवघर विभाग यांचे मार्गदर्शनाखाली श्री. मिलिंद देसाई, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, नवघर पोलीस ठाणे, सपोनि/भास्कर पुल्ली, सपोनि/ केकाण, पोउपनि/योगेश काळे, पोउनि/संदिप ओहोळ, पोना/१४१८ रविंद्र भालेराव, पोना/२९५६ ऐनोद्दीन शेख, पोशि/२८३८ युनुस गिरगांवकर, पोशि/३४५८ संदिप जाधव, पोशि/३३५६ चेतनसिंग राजपुत, पोशि/१६९४ नवनाथ माने यांनी केला आहे.

--------------ooooo--------------